।। सा विद्या या विमुक्तये ।।
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

**Office of the Controller of Examinations**
Phone: (02462)229294 website: srtmun.ac.in E-mail: srtmuncoe@gmail.com
FAX No: (02462) 229520

जा.क्र.संचालकपमुमं/कॉपीमुक्त/परीक्षा/२०१६-१७/९० दिनांक : २०/०४/२०१७.

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,
**मा. प्राचार्य तथा केंद्र प्रमुख**
उन्हाळी २०१७ सर्व परीक्षा केंद्र
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : **विद्यापीठीय परीक्षेतील गैरप्रकार रोखणे व कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडण्यासाठी दक्षता घेणेबाबत.**
संदर्भ : १.जा.क्र.विशिससं/उशि/नांवि/अनु-२/२०१६-१७/१५४२, दि. ०५/०४/२०१७ रोजीचे पत्र.
२.जा.क्र.२०१७/साप्र/संकीर्ण कावी-२२ दि. १८/०३/२०१७ रोजीचे मा. विभागीय आयुक्तांचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयी व संदर्भीय पत्रानुसार आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी २०१७ पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा हया विद्यापीठ कार्यक्षेत्रातील चारही जिल्हयातील निश्चीत केलेल्या परीक्षा केंद्रांवर सुरु आहेत. सदर परीक्षेत होणारे गैरप्रकार प्रतिबंधीत करुन या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात व विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणे परीक्षा उत्तीर्ण होण्यास सर्व ती दक्षता प्राचार्य तथा केंद्रप्रमुख व पर्यवेक्षक यांची आहे.

परीक्षा केंद्रावरील होणा-या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी प्रत्येक परीक्षा केंद्रावर अंतर्गत पथकाची (Internal Squad) नियुक्ती करण्याबाबत या विभागाचे पत्र क्र.परीक्षाविभाग/२०१६-१७/१९४१, दि. १४/०३/२०१७ रोजीच्या पत्रानुसार कळविण्यात आले होते. तसेच सर्व परीक्षार्थ्यांना परीक्षा केंद्रावर प्रवेश करतांना संपुर्ण तपासणी करावी व व कॉपीसदृश्य साहित्य परीक्षा केंद्रामध्ये घेऊन जाण्यासाठी परीक्षार्थ्यास प्रतिबंधीत करण्यात यावे.

तसेच वरील प्रकारे परीक्षेदरम्यान गैरप्रकार टाळण्यासाठीचे नियोजन काटेकोरपणे करुनही जर आपल्या परीक्षा केंद्रावर बैठे पथक व भरारी पथकाव्दारे भेटी दरम्यान परीक्षार्थी गैरप्रकार करतांना आढळुन आल्यास याबाबत नियमाप्रमाणे सर्व संबंधीतांवर कारवाई होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सबब, वरीलप्रमाणे गांभीर्याने नोंद घ्यावी व हि बाब सर्व परीक्षार्थी,शिक्षकव शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे निदर्शनास आणुन दयावी.

आपला,

**संचालक**
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव सादर :**
मा. कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. प्र-कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. जिल्हाधिकारी, नांदेड.
मा. सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग नांदेड.